महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय
जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२
वेबसाईट: www.mahasanskruti.org ई-मेल : natyamahotsav@gmail.com

---

# ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त महानाट्याचे आयोजन अर्ज मागविण्यासाठी मुदवाढ

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त राज्यातील जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पराक्रम व जीवनकार्यावर आधारित महानाट्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक नाट्यसंस्थांचे निर्माते यांना सादरीकरणासाठी आमंत्रित करण्यात येत आहे. अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या नाट्यसंस्थेच्या निर्मात्यांकडून दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ पर्यंत उपरोक्त पत्त्यावर प्रत्यक्ष अथवा natyamahotsav@gmail.com या इमेलवर अर्ज सादर करावेत. अटी, शर्ती, पात्रता पूर्ण करणाऱ्या इच्छुक संस्था निर्माते यांची अंतिम निवड समितीसमोर होणाऱ्या सादरीकरणातून होईल.

महानाट्य सादरीकरणासाठीच्या अटी / शर्ती / पात्रता mahasanskruti.org या वेबसाईटवर “नवीन संदेश” या मथळयाखाली उपलब्ध आहे.

सही /-
(विभीषण चवरे)
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय

# ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त महानाट्याचे आयोजन

## पात्रता / अटी / शर्ती

१. महानाट्य निर्मितीचा अनुभव असावा.

२. महानाट्याचे कमीत कमी २५ प्रयोग केलेले असावेत.

३. ऐतिहासिक स्वरुपाच्या महानाटयाचा अनुभव असावा.

४. कमीत कमी २०० कलाकारांचा समावेश असावा.

५. महानाट्याची संहिता रंगभूमी परिनिरीक्षण मंडळातून प्रमाणित केलेली असावी.

६. प्राणी वापरणार असल्यास त्याबाबत सक्षम प्राधिका-याची परवानगी असावी.

७. नाटक कमीत कमी २.३० तासाचे असावे.

८. नाटकाच्या नेपथ्यातून ऐतिहासिक वातावरण निर्मिती व्हावी असे नेपथ्य असावे.

९. नाट्य दिग्दर्शकाला कमीत कमी ०५ नाटकांचा अनुभव असावा.

१०.नाट्य संस्थेचे मागील पाच वर्षांचे वार्षिक लेखे असावेत.

## ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त महानाट्याचे आयोजन

## इतर

- कलात्मक विषयासोबत नाटकाचा दर ही महत्त्वाची बाब निवड करण्यासाठी लक्षात घेण्यात येईल .
- निव्वळ सादरीकरण किंवा निव्वळ रक्कम प्रति नाटक दर हे विचारात न घेता सादरीकरणाचा दर्जा आणि रक्कम या दोन्हीचा ताळमेळ घालून ही निवड करण्यात येईल .
- निवड करण्यात आलेल्या नाट्य संस्थेला नेमून दिलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी सलग तीन दिवस महानाट्याच्या प्रयोगाचे आयोजन करणे बंधनकारक राहील .
- महानाट्याचे आयोजन करत असताना अटी व पात्रता मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व निकष पाळून महानाट्याचे आयोजन करावे लागेल
- निवड समितीने महानाट्याच्या आयोजनासाठी निवडलेल्या संस्थांवर महानाट्य आयोजनाची जबाबदारी राहील .
- कोणत्या संस्थेला कोणती जिल्हा मुख्यालये देण्यात आले आहेत हे त्या संस्थेस स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.
- महानाट्याच्या आयोजनासाठी तांत्रिक सेवा पुरविण्यासाठी आणि इव्हेंट व्यवस्थापनासाठी वेगळया संस्थेची नियुक्ती करण्यात येईल.

# ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त महानाट्याचे आयोजन
## सादरीकरण करणे व गुणांकन

सादरीकरण कालावधी - १० मिनिट

**सादरीकरणातील मुद्दे** - संहिता, प्रमुख कलाकार, प्रॉपर्टीज वापर, नेपथ्य रचना, आधुनिक तंत्रज्ञान, कलाकार संख्या, गीत / संगीत / नृत्य लोककला यांचा वापर, वेशभूषा व रंगभूषा, संवाद कौशल्य, शिवाजी महाराज यांच्या विषयीच्या नाविन्यपूर्ण घटनांची मांडणी.

# ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त महानाट्याचे आयोजन

इच्छुक संस्थांनी भरावयाचे आवेदन पत्र

| अ.क्र. | तपशिल | भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव व पत्ता | |
| २. | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ३. | ईमेल आयडी | |
| ४. | संस्था कोणत्या अधिनियमाखाली नोंदविलेली आहे ? | |
| ५. | संस्था नोंदणी क्र. (सोबत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे) | |
| ६. | संस्थेने महानाट्याचे कमीत कमी २५ प्रयोग सादर केलेल्याचे पुरावे सोबत जोडावे | |
| ७. | यापूर्वी संस्थेने सादर केलेल्या ऐतिहासिक स्वरुपाच्या महानाट्याचा अनुभव सोबत जोडावा | |
| ८. | महानाट्यात किती कलाकारांचा समावेश आहे | |
| ९. | महानाट्याची संहिता रंगभूमी परिनिरीक्षण मंडळातून प्रमाणित केलेली आहे का | |
| १०. | सोबत रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे योग्यता प्रमाणपत्र सोबत जोडावे | |
| ११. | महानाट्यात प्राणी वापरणार असल्यास त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेतली आहे का | |
| १२. | महानाट्याचा कालावधी नमूद करावा | |
| १३. | नाटकाच्या नेपथ्याचे छायाचित्रे सोबत जोडावी | |
| १४. | महानाट्याच्या दिग्दर्शकाचे नाव | |
| १५. | नाट्य दिग्दर्शकाला कमीत कमी ०५ नाटकांचे दिग्दर्शन केल्याचा अनुभव आहे का असल्यास याबाबतचे पुरावे | |

| | | |
|---|---|---|
| | सोबत जोडावे. | |
| १६. | नाट्य संस्थेचे मागील पाच वर्षांचे वार्षिक लेखे (ऑडिट रिपोर्ट) सोबत जोडावे | |
| १७. | अटी/शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरीसह प्रमाणपत्र सोबत जोडावे. | |

ठिकाण : अध्यक्ष/सचिव स्वाक्षरी :

दिनांक : संस्थेचे पूर्ण नाव :

संस्थेचा रबरी शिक्का :

# ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त महानाट्याचे आयोजन

## प्रमाणपत्र

आम्ही प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, आवेदनपत्रात भरण्यात आलेली माहिती सत्य व बरोबर आहे. आम्ही महानाट्याचे प्रयोग सादरीकरणा संदर्भातील सर्व अटी व शर्ती वाचले असून त्या सर्वांचे पालन करीत आहोत. महानाट्य संदर्भातील शासनाचे सर्व नियम आम्हाला बंधनकारक आहेत. महानाट्याचा प्रयोग करण्यासाठी आमच्या संस्थेची निवड झाल्यास, दिलेल्या ठिकाणी, दिलेल्या तारखेस व वेळेत महानाट्याचा प्रयोग सादर करु.

ठिकाण :

दिनांक :

अध्यक्ष/सचिव स्वाक्षरी :

संस्थेचे पूर्ण नाव व पत्ता/दूरध्वनी क्र.
भ्रमणध्वनी क्रमांक

संस्थेचा रबरी शिक्का :

# ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त महानाट्याचे आयोजन
## महानाट्य प्रयोग सादर करण्याबाबतचे दर

------------------------------------------------------------------------------------------

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांचे पराक्रम व जीवनकार्यावर आधारित महानाट्याचा प्रयोग **एका जिल्ह्याच्या ठिकाणी सलग तीन प्रयोगांसाठी** कलाकार मानधन, नेपथ्य, प्रकाश, ध्वनी व्यवस्था, प्रवासखर्च, निवासखर्च, चहा, अल्पोपहार, भोजन खर्च इ. सर्व करांसहित एकत्रित मानधन पुढीलप्रमाणे नमूद करीत आहोत- | |

(अक्षरी रुपये )

ठिकाण :

अध्यक्ष/सचिव स्वाक्षरी :

दिनांक :

संस्थेचे पूर्ण नाव व पत्ता/दूरध्वनी क्र.
भ्रमणध्वनी क्रमांक

संस्थेचा रबरी शिक्का :